# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे
## श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७

## जाहीर सूचना

जा.क्र.-नियमन/मालमत्ता/वारसनोंद/जा.सू./गाळा क्र.७७१/२५९२ /२०२५-२६ दि. १४/१/२०२६

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गुलटेकडी पुणे येथील फळे भाजीपाला विभागातील गाळा क्रमांक ७७१ हा मे. जयबजरंग ट्रेडींग कंपनी या नावे नियमित शेतीमालाचे ठोक व्यवसायासाठी भाडेपट्टयाने देणेत आला आहे. सदर भागीदारी फर्मचे १) श्री. बबनराव नरसिंग बहिरट २) श्री. भाऊसाहेब आप्पासाहेब डोंबे ३) बाळकृष्ण भिमाजी सोनवणे हे भागीदार होते. मे. जयबजरंग ट्रेडींग कंपनी ही फर्म विसर्जित (Dissolved) झालेचा रजिस्टर ऑफ फर्मसचा दाखला सादर केला आहे. सदर दाखल्यामध्ये आर एस क्रमांक २२८८/२००० मध्ये मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पुणे यांनी दिनांक २१/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार डी.ए. सहस्त्रबुद्धे यांची एक सदस्यीय लवाद म्हणून नियुक्ती केली होती. लवाद आणि सामंजस्य कायदा १९६६ नुसार लवाद श्री. सहस्त्रबुद्धे यांनी दिनांक ११/९/२००६ रोजी निर्णय दिला. सदर लवादाचे निर्णयानुसार १) श्री. बबनराव नरसिंग बहिरट २) श्री. भाऊसाहेब आप्पासाहेब डोंबे हे दोघेही भागीदार दि. ११/९/२००६ पासून निवृत्त झाले आहेत. तसेच सदर भागीदारी संस्था ही विसर्जित झाली आहे. तसेच बाळकृष्ण भिमाजी सोनवणे यांचे दिनांक १३/२/२०२४ रोजी निधन झाले आहे. त्यामुळे मे. जयबजरंग ट्रेडींग कंपनी या भागीदारी फर्मबाबत वर नमुद केलेप्रमाणे लवादाने दिलेल्या निर्णयानुसार रजिस्टर ऑफ फर्मचे दाखल्यामध्ये नमुद केलेप्रमाणे १) श्री. बबनराव नरसिंग बहिरट २) श्री. भाऊसाहेब आप्पासाहेब डोंबे हे भागीदार निवृत्त झालेने सदर फर्म विसर्जित झाली आहे तसेच दरखास्त दावा क्र.८८७/२०१३ मध्ये मा.न्यायालयाने निर्गमीत केलेल्या दिनांक १५/७/२०१५ रोजीचे आदेशानुसार गाळयावरील भागीदारांची नावे व मालकी हक्क कमी करून तसेच मे.जय बजरंग ट्रेडींग कंपनी हे फर्मचे नाव कमी करून कै. बाळकृष्ण भिमाजी सोनवणे यांचे निधनामुळे त्यांचे नाव कमी करून संपुर्ण गाळयावर १) श्रीमती शोभा बाळकृष्ण सोनवणे (पत्नी) २) श्री. महेश बाळकृष्ण सोनवणे (मुलगा)३) श्री. सागर बाळकृष्ण सोनवणे (मुलगा) यांचे नावाची वारसनोंद करणेकामी या कार्यालयाकडे सादर केला आहे.

तरी, या गाळयाच्या वारसनोंदीबाबत कोणाची काही तक्रार/हरकत असल्यास, दिनांक२९/१/२०२६ पावेतो कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे यांचे कार्यालयामध्ये लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर कोणतीही तक्रार/हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सचिव सभापती

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

प्रत -

विभाग प्रमुख

फळे भाजीपाला विभाग.